MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात



माता रमाई महिला मंडळ यांच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष अधिकारी एपीआय अमन शिरसाट साहेब यांना निवेदन देताना माता रमाई महिला मंडळ च्या तालुकाध्यक्ष शीला सुखदेव उजगरे व सर्व महिला वृंदावन उजगरे सागरबाई उजगरे शोभा उजगरे राहीबाई उजगरे कलाबाई उजगरे सीताबाई उजगरे

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१३८ | रविवार दि.०२ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४


Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -138 | SUNDAY DT.02 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड जिल्ह्यात १८३ शस्त्र परवाने रद्द

## आणखी १२७ रद्द होणार, सरपंच देशमुख हत्या प्रकरणानंतर प्रशासन सतर्क

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर दहशत,सत्ता,पैसा,आणि बीडच्या वाळू माफिया आणि राखेचं भयानक वास्तव समोर आल्यानंतर मोठी खळबळ उडाली . पवनचक्की प्रकरणाप्रमाणेच बीडमध्ये बंदुकीचा धाक दाखवणाऱ्यांच्या संख्येत कमी नाही . गेल्या काही दिवसांपूर्वी हवेत गोळीबार करणाऱ्यांच्या व्हायरल व्हिडिओजने मोठी खळबळ माजली होती . सर्रास दिल्या जाणाऱ्या शस्त्र परवान्यांमुळे मोठी ओरड सुरू असताना आता संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर प्रशासन सतर्क झाला आहे .बीड जिल्ह्यात १८३ शस्त्र परभणी रद्द करण्यात आलेत .आणखी १२७ रद्द होणार आहेत . यामध्ये ८ जणांनी स्वतः सरेंडर होत आपली शस्त्रे जमा केली आहेत .सत्ता सत्ता श्रीमंती आणि वर्चस्व दाखवण्याची हाऊस जपणाऱ्या बीडच्या शस्त्र परवानाधारकांवर मोठी कारवाई करण्यात आली आहे .

संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दोन महिने उलटून गेल्यानंतर पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे .घाऊकपणे दिल्या जाणाऱ्या शस्त्र परवानांच्या तपासणीसाठी आता पावलं उचलली जात असून आत्तापर्यंत १८३ शस्त्र परवाने रद्द करण्यात आले आहेत .यात मृत असताना हे शस्त्र परवाना नावावर असणाऱ्यांची संख्या ११८ एवढी आहे .



### वाळू माफियांना प्रशासनाच्या सक्त सूचना

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर दहशत,सत्ता,पैसा,आणि बीडच्या वाळू माफिया आणि राखेचं भयानक वास्तव समोर आल्यानंतर मोठी खळबळ उडाली . पवनचक्की प्रकरणाप्रमाणेच बीडमध्ये वाळू माफिया आणि राख माफियांची दहशत समोर आल्यानंतर या वाळू तस्करांना कारवाई होणार की नाही असा प्रश्न उपस्थित केला जात असताना बीड जिल्ह्यातील २१ वाळू तस्करांना पोलीस अधीक्षकांनी इशारा दिला आहे .२६ जणांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे . नवे पोलीस अधीक्षक नवनीतकावत यांनी या संपूर्ण प्रकरणाची सूत्रे हाती घेताच जिल्ह्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्या विरोधात मोठी कारवाई केली आहे .

### शस्त्र परवान्याबाबत मोठी कारवाई

बीड जिल्ह्यात नोंदणीकृत १२८१ शस्त्र परवाने आहेत .यात ३१० प्रस्ताव रद्द करण्यासाठी पाठवण्यात आले असून यावर कारवाई करत आत्तापर्यंत १८३ शस्त्र रद्द करण्यात आले आहेत .१२७ शस्त्र रद्द होणार असल्याचा सांगण्यात आलंय . ही आत्तापर्यंतची सर्वात मोठी कारवाई असल्याचं सांगितलं जात आहे .

### शस्त्र परवाना असणाऱ्यांच्या घरी पोलिसांच्या चकरा

विशेष म्हणजे जिल्ह्यात ज्यांच्याकडे शस्त्र परवाना आहे,त्यांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून पोलीस कर्मचारी घरी जाऊन परवानाधारक शस्त्र हाताळण्यास सक्षम आहे का ?जिवंत आहे का ?याची खात्री करत आहेत . यात अनेक जण मृत असल्याचे समोर आले आहे .मृत असतानाही शस्त्र परवाना नावावर असणाऱ्यांचा आकडा ११८ असल्याचे समजते .त्यामुळे आता हे सर्व शस्त्र परवाने रद्द केले जाणार आहेत .

## वैभवी देशमुखांचा सवाल:नामदेव शास्त्रींना माझ्या वडीलांचे अश्रू अन् त्यांच्यावर केलेले वार दिसले नाही का?

बीड / प्रतिनिधी

नामदेव शास्त्रींना माझ्या वडिलांच्या अंगावरचे घाव दिसले नाही का असा संतप्त सवाल संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख हीने केला आहे. तर माझ्या वडिलांना हाल हाल करुन मारले आहे, ते नामदेव शास्त्रींना दिसले नाही का? असेही तिने म्हटले आहे.

दरम्यान वैभवी देशमुख यांनी पुढे म्हटलंय की , न्यायाधीशही दोन्ही बाजू ऐकून घेतो. महंत शास्त्रींनी आमचे म्हणणे काय आहे हे ऐकून घ्यायला हवे होते. त्यांना माझ्या वडीलांचे अश्रू त्यांच्यावरील वार आणि त्यांचे रक्त दिसले नाही का असा सवालही तिने केला आहे.

वैभवी देशमुख यांनी म्हटलंय की, अवादा कंपनीच्या परिसरात जे लोक आले होते ते खंडणी मागण्यासाठीच आले होते. त्यांनी आमच्या दलित बांधवांना मारले म्हणून माझे वडील





अडवण्यासाठी गेले, त्यानंतर माझ्या वडिलांनाच मारले. एवढेच नाही तर त्यांचे क्रूर हाल करुन त्यांना ठार केले.

नामदेव शास्त्रीचे वक्तव्य काय?

नामदेव शास्त्री म्हणाले की, संतोष देशमुख यांची ज्यांनी हत्या केली त्या आरोपींची मानसिकता देखील पाहायला पाहिजे होती. त्या आरोपींना देखील पूर्वी मारहाण झाली होती. हा त्यांच्या गावातील अंतर्गत विषय होता. त्याला मीडियाने मोठे केले असल्याचेही शास्त्री यांनी म्हटले आहे. तर भगवान गड धनंजय मुंडेंच्या पाठीशी आहे, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. तसेच धनंजय मुंडे हे खंडणीवर जगणारे नेते नसून राजकीय सुडापोटी त्यांच्यावर आरोप केले जात आहेत, असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.

महंत आरोपींचे समर्थन केले

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, जातिवादाचा चौथा नवीन अंक राज्याला पाहायला मिळाला, आरोपींच्या बाजूने मोर्चे निघाले, जातिवादाचा अंक भयंकर आहे. जातीय सलोखा बिघडला, पण धनंजय मुंडेच्या टोळीमुळे चौथा अंक पाहायला मिळाला. नामदेव शास्त्री आरोपींचा समर्थन करत आहे .संतोष देशमुख यांची हत्या केली म्हणून आरोपींना आनंद वाटला असेल . देशमुख कुटुंबीयांनी कुणाला भेटावे हा त्यांचा विषय आहे. महाराजांना जे बोलायचे ते बोलून जातीयवादाचा नवीन अंक देऊन गेले.

## स्वत:ची चूक झाकण्यासाठी डीवचू नका:राज्याला जातीवादाचा नवीन अंक पाहायला मिळाला

मनोज जरांगेंचा शास्त्रींवर हल्लाबोल

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी

ज्यांच्याकडे मानाचा तूरा आहे, तिथेही जातीवाद होऊ शकतो हा नवीन अंक राज्याला पाहायला मिळत आहे, एका समाजाला एका बाजूला नेण्याचे काम झाले आहे,असे म्हणत मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी नामदेव शास्त्री यांच्यावर टीकास्त्र डागले आहे.



दरम्यान मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, तुम्हाला आरोपींना मारलेली चापट दिसली. पण संतोष देशमुख यांचे रक्त दोन अडीच महिने कोणाला दिसले नाही आम्ही तुमचा सन्मान करतो, पण आपण आपले बघावे. दुसर्याकडे डोकवून पाहू नका, स्वत:ची चूक झाकण्यासाठी डिवचू नका, तुमच्याकडून चूक झाली आहे.

महंत आरोपींचे समर्थन केले

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, जातिवादाचा चौथा नवीन अंक राज्याला पाहायला मिळाला, आरोपींच्या बाजूने मोर्चे निघाले, जातिवादाचा अंक भयंकर आहे. जातीय सलोखा बिघडला, पण धनंजय मुंडेच्या टोळीमुळे चौथा अंक पाहायला मिळाला. नामदेव शास्त्री आरोपींचा समर्थन करत आहे .संतोष देशमुख यांची हत्या केली म्हणून आरोपींना आनंद वाटला असेल . देशमुख कुटुंबीयांनी कुणाला भेटावे हा त्यांचा विषय आहे. महाराजांना जे बोलायचे ते बोलून जातीयवादाचा नवीन अंक देऊन गेले.

तसे बोलणे म्हणजे गुंडगिरीला प्रोत्साहन

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आरोपींचे जर महंत समर्थन करत असतील तर हे राज्याचे फार मोठे दुर्दैव आहे. मी त्यांच्यावर बोलू शकत नाही. तसे बोलणे म्हणजे गुंडगिरीला प्रोत्साहन होत आहे. देशमुख कुटुंबीयांवर जो अन्याय झाला आहे, यावेळी संप्रदाय त्यांना मदत करत असतो. महंत शास्त्री कोणत्याच गुन्हेगारांची पाठराखण करणार नाही. पण जर असे असेल तर भयंकर मोठा विषय आहे. ही राज्याची खूप मोठी हानी आहे. खून केला त्यांचा आनंद आहे की काय, किंवा गुन्हेगारांना सोडून द्या असा त्यांचा अर्थ होतो.

## पेठ विभाग शिवजयंतीच्या अध्यक्षपदी गुलाब गायकवाड तर सचिवपदी रोहित फावडे

**धारूर / प्रतिनिधि**

**सार्वजनिक शिवजयंती उत्सव पेठ विभाग शिवजयंतीची कार्यकारणी नुक्तीच जाहीर झाली आहे दी.३१ जानेवारी रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत विविध पदांच्या नियुक्तया संपन्न झाल्या अध्यक्षपदी गुलाब गायकवाड तर उपाध्यक्ष वैभव चव्हान, कोषाध्यक्ष, माऊली औताडे व सचिवपदी रोहित फावडे यांची नियुक्ती करण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या थाटामाटात उत्साहात साजरी करण्यात येते.**





दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव पेठ विभाग किल्ले धारूर वतीने शिवजयंती थाटामाटात करण्यात येणार आहे त्याच अनुषंगाने ३१ जानेवारी वार शुक्रवार रोजी शिवजन्मोत्सव आयोजित बैठक ज्येष्ठ मार्गदर्शक अर्जुन गायकवाड, संजय फावडे, बिभीषण गायकवाड, सुरेश गवळी,बाळासाहेब गायकवाड, बालू चव्हान, गौतम चव्हाण,मोहन भोसले, सत्यप्रेम औताडे, बंडू फावडे,सुनील कावळे, प्रभाकर फावडे, डॉ.नवनाथ चव्हाण या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली. गेल्या अनेक वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या थाटामाटात उत्साहात साजरी करण्यात येते. यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव पेठ विभाग अध्यक्षपदी गुलाब गायकवाड, उपाध्यक्षपदी वैभव चव्हान, कोषाध्यक्षपदी माऊली औताडे, सचिवपदी रोहित फावडे, सहसचिव पदी बळीराम जेधे, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी मिरवणूक प्रमूख, नाना चव्हाण,आशिष भोसले, ऋषिकेश फावडे, तुषार औताडे,निखिल फाटे, विकी चव्हाण,रोहित फावडे,शिवराज औताडे, कृष्णा गायकवाड, गजानन फावडे,प्रशांत चव्हाण, रवी गायकवाड, महेश खवतोडकर, एकनाथ औताडे, दत्ता फावडे,अमर पंडीत, राम फावडे, बाळू भोसले, टिल्लू तट, योगेश अंधारे,बबलू सावंत, रोहित गायकवाड तर यावेळी बैठकीसाठी शिवभक्त सतिराम जेधे, मोणू औताडे, प्रथमेश गायकवाड, प्रणव औताडे, शिवराज भोसले, गौरव चव्हाण, श्याम फावडे, आमर भांवडलकर, विनय शिंदे, ऋषी गायकवाड, योगेश सावंत, अमोल सीरसट, सोनु, शिंदे, अमर वैष्णव, विशाल चव्हान,रुपेश सावंत, यांच्यासह मोठया संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते.

## बीड जिल्हा एमजीपी कार्यालय म्हणजे घर आपणा कभीभी आओ कभीभी जाओ खराटे

# साहेब हे परिपत्रक वाचाच!

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील अधिकारी कर्मचारी नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला बायोमेट्रिक मशीनद्वारे पगार काढण्याचा संकल्प करावा अशी बातमी सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ बीड दिनांक ०१.०१.२०२५ च्या अंकामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. याची अंमलबजावणी झाली का? विचारण्यासाठी कार्यकारी अभियंता श्री. खराटे यांना फोन केलं असता त्यांनी फोन उचललं नाही. कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधत्मक उपाय म्हणून स्थिगित केलेल्या बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर सुरु करणे यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक : समय २०२०/ प्र. क्र. ३१/१८( र. वका.) दिनांक २३.०५.२०२२ वाचा. या साठी प्रतिबांधत्मक उपाय म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामधील बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर १००% क्षमतेने सुरु झालेली आहेत. तसेच सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती आता बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीवरच नोंदविण्यात यावी. सर्व शासकीय कार्यालयाच्या आस्थापना शाखांनी सर्व अधिकारी कर्मचारी कार्यालयात येतांना व कार्यालय सोडतांना त्यांची उपास्थिती बायोमेट्रिक प्रणालीवरच नोंदवित आहे याची दक्षता घ्यावी. माहिती तंत्रज्ञान उपविभाग, सामान्य प्रशासन



विभाग मंत्रालय मुंबई यांनी शासकीय कार्यालयातील सर्व ठिकाणी बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली पूर्ण क्षमतेने सुरु राहण्याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार शासनाचे सहसचिवानी परिपत्रक काढले आहे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचारी यांना मान्य नाहीत का? बायोमेट्रिक हजेरी प्रणाली हा पथदर्शी प्रकल्प मे, २००९ पासून मंत्रालयात लागू करण्यात आला. १७ वर्ष होऊनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचारीयांना लागू होता नाही का? कार्यालतील कर्मचारी पर्यायी व्यवस्था करून गायब असतात आठवड्यातून फक्त दोन ते तीन दिवस हजर असतात जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्यातील सर्व शासकीय कार्यालयात पथके पाठवून माहिती घ्यावी. जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांना बायोमेट्रिकद्वारे पगार काढण्यासाठी सक्तीचे आदेश काढावेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील दांडी बहाद्दूर कर्मचाऱ्यांना चपराक बसणार, मुख्य अभियंता श्रीमती मनीषाताई पलांडे मॅडम यांचे नियंत्रण नाही का? बीड विभागातील कोण कधी येतो कधी जातो याचा ताळमेळ श्री. खराटे यांना लागलेला दिसत नाही? दिनांक १ जानेवारी २०२५ पासून बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर करून पगार काढा, अहवाल मागवा, शासन लाखो रुपये कर्मचाऱ्यांना पगार आहे, जनतेला विचारण्याचा अधिकार आहे. काम नाही तर पगार नाही अशी संकल्पना करा, जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयाना बायोमेट्रिक प्रणालीचा वापर करून पगार काढण्याचे फर्मान जारी करा. शासन परिपत्रक वाचाच, दांडी बहाद्दूर कर्मचारीयांना लगाम लावा. खराटे साहेब शासन गतिमान करा, १ जानेवारी २०२५ पासून बायोमेट्रिक प्रणालीद्वारे कर्मचाऱ्याचा उपस्थितीचा आकडा द्या आम्ही दैनिक आरंभ मध्ये प्रसिद्ध करू, मनीषाताई पलांडे मॅडम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील अधिकारी कर्मचारी यांचा बायोमेट्रिक प्रणालीचा अवलंब करून पगार काढा, दांडी बहाद्दूर अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई कराच. शासन परिपत्रकाची पायामाल्ली होणार नाही हे अधिकारी कर्मचारी यांचे लक्षात आणुन द्या.


# बीड तालुक्यात तहसीलदारांची व मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांची शासकीय वसुलीसाठी लगबग

**बीड।प्रतिनिधी**

**तहसीलदार चंद्रकांत शेळके शनिवारी सुटीचा दिवस असला तरी शासकीय वसुलीच्या आढाव्यासाठी , पाठपुराव्यासाठी शहरात बैठक घेताना दिसले . अधिकची माहिती घेतली असता असे समजले की ३१ मार्च अखेर जिल्हाधिकाऱ्यांसह , सर्व तहसीलदार यांना वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे असते . त्या अनुषंगाने जमीन महसूल , अकृषीक कर (एन ए ) , गौण खनिज कर इत्यादी वसुलीसाठी** या अधिकाऱ्यांची लगबग सुरू असते .

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पदभार स्वीकारल्यापासून लोकांचे प्रश्न सोडवत असताना मंडळस्तरीय बैठका घेतल्या . या बैठकांमध्ये त्यांनी वसुलीचा विषय सुद्धा लावून धरला . मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना जमीन महसूल , अकृषीक कर , अनधिकृत अकृषीक कर , गौण खनिज वसुली म्हणजेच मुरूम , माती , वीटभट्टी इत्यादीकडून वसुली करावी अशा सूचना दिल्या . समाधानकारक वसुली न झाल्यास वेळप्रसंगी कारवाई केली करण्यात येईल , असे सुद्धा त्यांनी स्पष्ट केले .

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे महसूल अधिकारी बैठकांमध्ये उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांचा सविस्तर आढावा घेत असतात . यात शासकीय वसुली ३१ मार्च अखेर कोणत्याही परिस्थितीत शंभर टक्के झाली



पाहिजे यासाठी त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला . त्यामुळे जिल्ह्यात सर्वत्रच महसूल अधिकारी वसुलीच्या कामात व्यस्त आहेत . निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविल्यानुसार जमीन महसूल व त्यावरील उपकर व अकृषीक कर ही प्रपत्र अ ची वसुली असते . तर खदानी , क्रशर , मुरूम , माती याकडून गौणखनिजाची जी वसुली होत असते तिला प्रपत्र ब ची वसुली असे म्हणतात . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी स्पष्ट केले की बीड उपविभागात रेल्वेची कामे सुरू असल्याने मुरुमाची रॉयल्टी मिळाली आहे . तथापि वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तहसीलदार , नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांनी अधिकची मेहनत घेणे अपेक्षित आहे .

बीड तालुक्याचा विचार करता २०. ४० कोटी इतका वसुलीचा इष्टांक आहे . त्यापैकी ८. ३५ कोटी इतकी वसुली झाल्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले . तसेच पुढील दोन महिने बीड शहर व परिसरातील पेट्रोल पंप , मोठी बांधकामे , एम एस ई बी , एसटी महामंडळ यासह हॉटेल व्यावसायिक यांच्याकडून अकृषिक वसुली करण्यावर भर देण्यात येत असून क्रशर , खदानी , मुरूम यातून वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले . बीड तालुक्यात तहसीलदारांना समवेतच तलाठी ग्राम महसूल अधिकारी सुद्धा वसुलीच्या कामासाठी फिरत असल्याचे या निमित्ताने दिसून आले .

सर्वसाधारणपणे सर्व प्रकारच्या शासकीय वसुलीचे काम ग्रामस्तरावर ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांना करावे लागते . वसुलीचे काम वेगाने व नियमित करण्यावरच महसुल विभागाची कार्यक्षमता व परिणामकारकता अवलंबुन असते . जमीन महसूल , गौण खनिज वसुली , इतर कर , उपकर तसेच जमीन महसूलाची थकबाकी म्हणून ठरविलेल्या बाबींची वसुली करणे हे महसूल खात्याचे प्राथमिक व अत्यंत महत्वाचे कार्य समजले जाते . शासकीय वसुलीच्या विविध बाबी , वसुलीच्या तारखा व घ्यावयाची दक्षता या बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे .

## नाथा हिंगणे यांचे दुःखद निधन



आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील देवळाली पानाची माळीमळा येथील वारकरी संप्रदायातील छंद असणारे हरिभक्त परायण नाथा बागुजी हिंगणे यांचे वयाच्या ८० वर्षे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले ते सतत धार्मिक सामाजिक कार्यक्रमात अग्रेसर असायचे त्यांच्या पार्थिवावर शोकाकुळ वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी पारूबाई नाथा हिंगणे व मुले विठ्ठल नाथा हिंगणे नामदेव नाथा हिंगणे हरिभाऊ नाथा हिंगणे असा परिवारासून त्यांचा दशक्रिया विधी रविवार दिनांक ९/२/२०२५ रोजी देवळाली पानाची येथे होणार आहे

# कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे कधीच वाटलं नाही मी एकटी आहे

# जालन्यात ना. पंकजाताई मुंडे यांचा भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद

जालना ।प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जाण्यानंतर जबाबदारी वाढली, यात काम करत असतांना कार्यकर्त्यांचे एवढे प्रेम मिळाले की कधीच वाटलं नाही मी एकटी आहे, त्यामुळे माझ्यात आणि कार्यकर्त्यांत कधीच अंतर पडू देणार नाही असे भावोदगार राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे काढले.

ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील भाजप संपर्क कार्यालयास भेट देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. आ. संतोष दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, भास्कर दानवे, सुनील आर्दड, अवधूत खडके आर्दीसह पदाधिकारी, नगरसेवक, सर्व तालुक्याचे मंडलाध्यक्ष यावेळी उपस्थित होते. जिल्हयाच्या पालकमंत्री झाल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या स्वागताला प्रचंड गर्दी झाली होती, हा धागा पकडून बोलतांना त्या म्हणाल्या, गर्दी आणि मुंडे हे समीकरण जुनेच आहे. मुंडे साहेबांपासून आमचे जालना जिल्ह्याशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. केंद्रीय मंत्री म्हणून चांगले काम करणारे रावसाहेब दानवे आणि मुंडे साहेब यांनी गावोगाव जाऊन कार्यकर्ता जोडला, पक्ष वाढवला. मुंडे साहेबांच्या जाण्यानंतर जबाबदारी वाढली तथापि काम करतांना कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे कधीच वाटल नाही मी एकटी आहे. जात धर्माच्या पलिकडे जाऊन काम करण्याचे संस्कार आमच्यावर आहेत. फंड मिळेल नाही मिळेल, एखादे काम होईल नाही होईल पण कार्यकर्त्यांमध्ये कधी अंतर पडू देणार नाही असं त्या म्हणाल्या.

एक हजार सदस्य नोंदणी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मानसंघटन पर्व अंतर्गत एक हजार सदस्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा यावेळी ना. पंकजाताई मुंडे हस्ते सन्मान करण्यात आला.पक्षाचा प्रत्येक आदेश तंतोतत पाळा. प्रत्येकाने एक हजार सदस्य करावेत आणि विक्रमी नोंदणी करावी असं आवाहन त्यांनी केलं. कार्यक्रमानंतर ना. पंकजाताईंनी लोकनेते मुंडे साहेब चौकातील मुंडे साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.शिवसेना जिल्हाप्रमुखांच्या निवासस्थानी भेटना. पंकजाताई मुंडे यांनी छत्रपती संभाजीनगरकडे रवाना होण्यापूर्वी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी घुगे परिवाराच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. आ. अर्जुन खोतकर, आ. हिकमत उढाण, संपर्क प्रमुख पंडित भुतेकर यावेळी उपस्थित होते.



# संतोष देशमुख यांच्या हत्येला पाठिंबा नाही

मी कधीही हत्येला पाठिंबा दिलेला नाही. मी वारकरी आहे. आम्ही प्राणी मारत नाही. आम्ही शाकाहारी माणसं आहोत. माणूस मारल्यानंतर आम्ही त्याला पाठिंबा देऊ असे तुम्हाला का वाटतं? असा सवाल नामदेव शास्त्रींनी उपस्थित केला.बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे सध्या मराठवाड्यातील राजकारण तापलं आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने आंदोलन केले जात आहेत. त्यातच आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांना क्लीनचिट दिली आहे. धनंजय मुंडे हा खंडणी घेऊन जगणारा माणूस नाही. त्यांच्यासोबत मीडिया ट्रायल सुरू आहे असे विधान भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री म्हणाले. यानंतर यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यातच आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी मी संतोष देशमुख यांच्या हत्येला मी कधीही पाठिंबा दिलेला नाही, असे म्हणाले. ते 'टीव्ही ९ मराठी'शी बोलत होते.

मी कधीही हत्येला पाठिंबा दिलेला नाही

नुकतंच भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांच्याशी 'टीव्ही ९ मराठी'ने संवाद साधला. यावेळी त्यांनी केलेल्या विधानाबद्दल सविस्तर भाष्य केले. धनंजय मुंडेंची अवस्था आणि त्यांची मानसिकता याला मी आधार दिला. मी त्यांना हे सांगितलं की माझा त्यांना पाठिंबा आहे. संतोष देशमुख यांची जी हत्या झाली, यात जे कोणी आरोपी आहेत, त्यांना फाशी व्हावी यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री प्रयत्न करतात. यंत्रणा काम करते. न्यायालयीन व्यवस्था काम करतेय. यात नामदेव शास्त्री कुठे आहेत. मी कधीही हत्येला पाठिंबा दिलेला नाही. मी वारकरी आहे. आम्ही प्राणी मारत नाही. आम्ही शाकाहारी माणसं आहोत. माणूस मारल्यानंतर आम्ही त्याला पाठिंबा देऊ असे तुम्हाला का वाटतं? असा सवाल नामदेव शास्त्रींनी उपस्थित केला.

धनंजय मुंडेंची आई आणि बाबा हे भगवान बाबांचे शिष्य आहेत. परंपरेने ते भगवान बाबांचे भक्त आहेत आणि एखादा भक्त जर भगवान गडावर आला आणि त्याने जर आशीर्वाद दिला तर त्याचे राजकारण करण्याइतपत कोती बुद्धी महाराष्ट्राची



नसावी असे मला वाटते, असेही नामदेव शास्त्री म्हणाले.

हत्येचा आणि पाठिंब्याचा विषय वेगवेगळा धनंजय मुंडे हे जेव्हा भगवान गडावर आले तेव्हा त्यांच्या हाताला सलाईनची सुई होती. त्यांना गडावर आल्यावर सलाईन लावलेली होती. ज्या माणसाचा चेहरा ५३ दिवसांपासून खराब झालेला आहे, त्याच्या हाताला सुई आहे, रक्त येतं,

### तुम्ही साधूवर आक्षेप घेता ही कोणती बुद्धी असावी

सध्या सर्वजण एकत्र येऊन धनंजय मुंडेंच्या मागे लागलेले आहेत. मग त्या माणसाने किती आघात सहन करावे. गेल्यावेळीही आघात झाले. आताही आघात होतात. मानसिक आधार देणं हा वारकरी संप्रदायात गुन्हा मानला जात नाही. मी जर हत्येच समर्थन केले, आरोपीचं समर्थन केलं असतं तर तुमचं बोलणं योग्य होतं. आरोपीला फासावर चढवा, पण जो निर्दोष आहे त्याच्यासोबत बोललं तरी तुम्ही साधूवर आक्षेप घेता, म्हणजे ही कोणती बुद्धी असावी, असा सवालही त्यांनी उपस्थितीत केला.

तरीदेखील एखाद्या संताने आशीर्वाद द्यायचा नाही ही कुठली वृत्ती आहे. हत्येचा आणि पाठिंब्याचा विषय वेगवेगळा आहे. ते भगवान गड मोठा करतात. हत्येला किंवा आरोपीला पाठिंबा दिला असता तर तुमचं म्हणणं बरोबर होतं, असेही नामदेव शास्त्रींनी सांगितले.

संतोष देशमुखांच्या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी भगवानगड उचलायला तयार

संतोष देशमुखांच्या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी भगवानगड उचलायला तयार आहे. माणूस परत येत नाही हे सत्य आहे. त्यांना जेवढा खर्च लागेल, जितका निधी लागेल, त्यांच्या लग्नापर्यंत, त्यांच्या शिक्षणापर्यंत सर्व खर्च भगवान गड उचलायला तयार आहे. अगोदर १५० विद्यार्थी आहेत अजून दोन विद्यार्थी वाढले तर काही फरक पडत नाही. भगवान गडाचे ते कर्तव्य आहे.

# गेवराई न.प. फंडातील झालेल्या कामांची चौकशी करण्याची गरच!

बीड (प्रतिनिधी)

गेवराई नगरपरिषद फंडातून मंजूर झालेल्या कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याची शक्यता वर्तवली जात असून, या प्रकरणावर नगरपरिषद कार्यालयात मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. अनेक स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी काम न करता फक्त कागदोपत्री मंजुरी देऊन बिल उचलल्याचा बोललं जात आहे. या प्रकरणाची तात्काळ प्रशासकाने चौकशी करण्याची मागणी नागरिकाकडून केली जात आहे.




नगर परिषद गेवराई फंडातून मंजूर झालेल्या काही कामांना प्रत्यक्षात सुरुवातदेखील झाली नाही, तर काही कामे अर्धवट स्थितीतच थांबली आहेत. तरीही या कामांसाठी निधीचा विनियोग झाल्याचे दाखवण्यात आले आहे. यामुळे फंडाचा अपव्यय होत असल्याचे आरोप पुढे येत आहेत. फंडातून मंजूर कामांची यादी, त्यासाठी मंजूर रक्कम, पूर्ण झालेली कामे, तसेच अपूर्ण राहिलेल्या कामांची तपासणी करणे अत्यावश्यक असल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे.

या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि भ्रष्टाचाराचे मूळ शोधले जावे, अशी नागरिकांची मागणी आहे. या भ्रष्टाचारामुळे मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या गरजांवर गंभीर परिणाम होत असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रशासकांनी तातडीने लक्ष घालून चौकशीची प्रक्रिया सुरू करावी, अशी सर्वसामान्य जनतेची मागणी आहे. या प्रकरणातील सत्य बाहेर येऊन जबाबदार व्यक्तींवर कारवाई झाली, तरच भ्रष्टाचाराला आळा बसेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

# दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी 'आप'ला मोठा धक्का!

दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. आम आदमी पक्षाचे ८ आमदार आणि काही विद्यमान आणि माजी नगरसेवक भाजपमध्ये सामील झाले आहेत.निवडणुकीपूर्वी इतक्या मोठ्या संख्येने आप नेते भाजपमध्ये सामील झाल्याने केजरीवाल यांच्या अडचणी वाढू शकतात.

कोणते आप नेते भाजपमध्ये सामील झाले?

✻ भावना गौर, ✻ कस्तुरबा नगरचे तीन ✻ गिरीश सोनी, ✻ राजेश ऋषी, ✻ नरेश यादव, ✻ पवन शर्मा, ✻ रोहित मेहरोलिया, ✻ बिजेंद्र गर्ग, माजी आमदार ✻ अजय राय, नगरपालिका नगरसेवक

भाजप नेते बैजयंत पांडा यांचे विधानयावेळी भाजप नेते बैजयंत पांडा म्हणाले, 'आज एक ऐतिहासिक दिवस आहे आणि निवडणुकीच्या तीन दिवस आधी इतक्या मोठ्या संख्येने आमदार, नगरसेवक आणि पदाधिकारी आपत्तीतून मुक्त झाले आहेत आणि आता दिल्लीची वेळ आहे. सर्वात मोठ्या लोकशाही आणि



पारदर्शक पक्षात सर्वांचे स्वागत आहे. आपण जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत आणि लवकरच भारत तिसरा सर्वात मोठा देश बनणार आहे. आज जग आपले कौतुक करत आहे. अशाप्रकारे, देशात जी प्रगती होत आहे, त्यात प्रत्येकाचा विकास होत आहे आणि तरुण, महिला आणि समाजातील प्रत्येक घटक पुढे जात आहे.

# भरधाव दोन कारची समोरासमोर धडक

## तीन जण ठार:तीन जखमी, केज-अंबाजोगाई मार्गावरील चंदनसावरगावजवळ अपघात

बीड /प्रतिनिधी

भरधाव दोन कारची समोरासमोर जोरात धडकहोऊन तीन जण ठार, तर तीन जण जखमी झाले.अहिल्यानगर - अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गावरीलकेज - अंबाजोगाई रस्त्यावर असलेल्याचंदनसावरगावजवळ ३१ जानेवारी रोजी रात्री १०.४५वाजेच्या सुमारास हा अपघात झाला.बीड तालुक्यातील खांडेपारगाव येथील परमेश्वरनवनाथ काळे (३७) व समनापूर येथील गणपतनारायण गोरे (४२) हे दोघे लातूरहून बीडकडे कारनेयेत होते. याच वेळी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुडयेथील अमित ऊर्फ विकी दिलीपराव कोमटवार(३५) हे कारने बीडहून अंबाजोगाईकडे निघालेहोते. केज - अंबाजोगाई रस्त्यावरील




चंदनसावरगावयेथील एका पेट्रोल पंपाजवळ भरधाव दोन्ही कारचीसमोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातातदोन्ही कारच्या समोरील बाजूचा चुराडा झाला. यातपरमेश्वर काळे हे जागीच ठार झाले. गंभीर जखमीगणपत नारायण गोरे (४२) यांचा रस्त्यात मृत्यूझाला. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथीलअमित ऊर्फ विकी दिलीपराव कोमटवार यांचाउपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच विनोद सुभाषशिंदे, अविनाश केरबा खुराडे, विष्णू उत्तम धोतरे(तिघे रा. अंबाजोगाई)

# १२ लाखांपर्यंत आयकर नाही

संपूर्ण देशाचे लक्ष बजेटकडे लागले होते. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. केंद्र सरकारनं दशकातील सर्वात मोठा दिलासा नोकरदार वर्गाला दिलाय. १२ लाखांचं उत्पन्न कर करण्याची घोषणा ही बजेटमधील सर्वात महत्वाची घोषणा आहे. बेजटमध्ये देशातील विविध राज्यांसाठी देखील बजेटमध्ये विशेष तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले याची मागिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मिडियावर शेअर केली आहे.



मध्यमवर्गासाठी हे ड्रीम बजेट असल्याचं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. तर नव्या कररचनेमुळे नोकरदारांना मोठा फायदा होणार असल्याचंही ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बजेटचं कौतुक केलं आहे. मेट्रो प्रकल्प, हायस्पीड रेल्वे या विविध योजनांसाह अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मात्र, ही केवळ प्राथमिक माहिती असून विविध मंत्रालयांची तरतूद तसेच रेल्वेची आकडेवारी सविस्तरपणे येईल असे देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

मुंबई, पुणे मेट्रो, हायस्पीड रेल्वे मुंबई मेट्रो : १२५५.०६ कोटी पुणे मेट्रो : ६९९.१३ कोटी एमयुटीपी : ५११.४८ कोटी एमएमआरसाठी एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधा: ७९२.३५ कोटी मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे : ४००४.३१ कोटी सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : १०९४.५८ कोटी महाराष्ट्र ग्रामीण जोडसुधार प्रकल्प: ६८३.५१ कोटी महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क : ५९६.५७ कोटी नागनदी सुधार प्रकल्प : २९५.६४ कोटी मुळा-मुठा नदी संवर्धन : २२९.९४ कोटी ऊर्जा कार्यक्षम उपसा सिंचन प्रकल्प : १८६.४४ कोटी किती बदलला टॅक्स ० ते १२ लाखांपर्यंत - काहीच कर नाही १२ ते १६ लाखांपर्यंत - १५ टक्के आयकर लागणार १६ ते २० लाखांपर्यंत २० टक्के आयकर लागणार २० ते २४ लाखांपर्यंत २५ टक्के आयकर लागणार २४ लाखांपेक्षा जास्त ३० टक्के आयकर लागणार

# छगन भुजबळांकडून पोलिसांची कानउघडणी

**म्हणाले; बीडचं नाव घेता इतर ठिकाणी काय सुरुय?**

**नाशिक (प्रतिनिधी)**

**येवला शहर परिसरातील अवैध धंद्याबाबत माजी मंत्री आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ आक्रमक झालेत. बीडचं नाव न घेता राज्यात इतर ठिकाणी काय चाललंय? ते या ठिकाणी घडवायचं नाही. येवला तालुक्यात शांतता राहिली पाहिजे, असं म्हणत छगन भुजबळ यांनी पोलीस अधिकाऱ्यांची कान उघडणी केली आहे. येवल्यात उभारण्यात आलेल्या नवीन पोलीस स्टेशनच्या इमारतीच्या उदघाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले..यावेळी त्यांनी पोलिसांच्या कामकाजाबाबत एका प्रकारे नाराजी व्यक्त केली.**

येवला शहर परिसरात सुरु असलेल्या अवैध धंद्याबाबत आमदार छगन भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेत मी अनेक वेळा या धंद्या बाबत तक्रार केली मात्र धंदे सुरूच आहे..बीडचं नाव न घेता भुजबळ यांनी राज्यात इतर ठिकाणी काय चालल ते या ठिकाणी घडवायचं नाही. या तालुक्यात शांतता राहिली पाहिजे, असं सांगत भुजबळ यांनी पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या उपस्थित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कान उघडणी केली..

छगन भुजबळ म्हणाले, कोणाचा कार्यकर्ता आहे हे पाहायचं नाही, जे चुकीचं काम करत असतील त्यांच्यावर तुम्ही कारवाई केली पाहिजे. या मंत्र्याचा फोन आला, त्या मंत्र्याचा फोन आला म्हणून असला धंदा करायचा नाही. इथे काही अवैध धंदे सुरु आहेत. आम्ही पत्त्यासह माहिती दिली आहे. एकदा बंद झाला परत चालू झाला. आपले पोलीस काय करतात. परत परत तुमच्याकडे यावे लागू नये. इतर ठिकाणी काय चालूये ते माझ्या तालुक्यात चालणार नाही.



- येवला शहर परिसरातील अवैध धंद्या बाबत छगन भुजबळ आक्रमक...
- बीडचं नाव न घेता राज्यात इतर ठिकाणी काय चाललं ते या ठिकाणी घडवायचं नाही...
- तालुक्यात शांतता राहिली पाहिजे ; पोलीस अधिकाऱ्यांची केली कान उघडणी...

येवला शहर परिसरात सुरु असलेल्या अवैध धंद्याबाबत आमदार छगन भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेत मी अनेक वेळा या धंद्या बाबत तक्रार केली मात्र धंदे सुरूच आहे..बीडचं नाव न घेता भुजबळ यांनी राज्यात इतर ठिकाणी काय चाललं ते या ठिकाणी घडवायचं नाही. या तालुक्यात शांतता राहिली पाहिजे असे सांगत त्यांनी पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या उपस्थित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कान उघडणी केली.

# आदरणीय कल्याणराव आखाडे : नेतृत्व घडविणारा नेता

**सावता परिषदेचा १८ वा.वर्धापन दिन झाला. या दिनानिमित्त सावता परिषदेबद्दल शब्दातून कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न कारण सावता परिषद शब्दात सामावणारा विषय नाही.सावता परिषदेची स्थापना माझ्यासारख्या असंख्य पदाधिकाऱ्यांना ही एक संधी ठरली.सावता परिषदेच्या स्थापनेमुळेच माझ्यासारखे असंख्य पदाधिकाऱ्यांना ओळख मिळाली. सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय कल्याणराव आखाडे साहेब हे माझ्यासाठी नेतृत्व घडविणारे विद्यापीठ आहे. ३१ जानेवारी २००७ रोजी सावता परिषदेची स्थापना झाली.**

संघर्षाच्या कुशीत घडलेले आदरणीय कल्याणराव आखाडे साहेब यांच्या



विचारात,कर्तृत्वात दिशा आहे.त्यांनी केवळ सावता परिषदेलाच जन्म दिला नाही तर असंख्य नेतृत्व विकसित व्हावे,मोठे व्हावेत म्हणुन असंख्य पदाधिकाऱ्यांच्या सामाजिक , राजकीय नेतृत्वाला देखील जन्म दिला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.त्यातील मी पण एक आहे.सावता परिषद माझी ओळख म्हणून जगणारा आणि मानणारा मी पदाधिकारी आहे.'तु फार छान बोलतोस' म्हणून अनेकजण माझी प्रशंसा करतात.पण माझे मत आणि मन मला नेहमी सांगतं ही ओळख सावता परिषदेने दिली.सावता परिषदेने विचारमंच दिला.त्यामुळे व्यक्त होण्याची संधी मिळाली.म्हणुन कोणताही आकार,ऊकार नसलेल्या व्यक्तीमत्वामध्ये अनेक अक्षर जमा करून सावता परिषदेने बाराखडीचे ( स्वर, व्यंजनासह) रूप दिले.आज महाराष्ट्राच्या अनेक भागात डॉ .राजीव काळे हे नाव आणि आवाज पोहोचविण्याचे काम सावता परिषदेने केले.म्हणुनच सावता परिषद माझ्यासाठी वंदनीय आहे. माझ्या जीवनात राजकीय प्रवास सुरू झाला तेव्हापासून कल्याणराव आखाडे या नेत्याच्या विचारांवर प्रेम करायला लागलो.ते आजतागायत याच नेत्याच्या विचारांशी प्रामाणिक आहे.कल्याणराव आखाडे केवळ नेता नाही.तर कल्याणराव आखाडे विचार आहे.माझ्यासाठी नेतृत्वगुणांचे विद्यापीठ आहे. कल्याणकाका आखाडे या नेत्याबद्दल अनेकांना चिड,जळाऊपणा,राग असु शकतो,येत असेल.त्याची कारणे कदाचित हा काल यथ असणारा महाराष्ट्रात पोहोचला कसा? हे देखील असेल.असो परंतु या नेत्यांनी आज सावता परिषदेच्या झेंड्याखाली कोणाला गंडवले नाही.कधी कोणाच्या नावाने पावत्या फाडल्या नाही.आज राज्याच्या सत्तावीस जिल्ह्यात सावता परिषदेचे जाळे निर्माण करणारा हा सामान्य अतिसामान्य कुटुंबातील असामान्य नेता आहे. सत्तेच्या पदराआड राहणाऱ्या अनेकांना असे वाटते की, राजकीय सत्तेचा फायदा घेऊन आर्थिक फायदे करून दिले पाहिजे.सत्तेतील नेता म्हणून पदाधिकाऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे तो मिळेलच.परंतु संघटनेच्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी नसणारे,कायम सावता परिषदेवर टिका टिप्पणी करणाऱ्यांनाच सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची काळजी वाटते.हे विशेष आहे.हेच माझ्या नेत्याचे यश आहे.कारण केवळ पैशाचे,कामाचे , सत्तेचे आमिष दाखवून सावता परिषद उभी केलेली नाही.सावता परिषद एकमेव संघटन आहे जीच्या चिरेबंदी किल्याचे दगड काढण्याचे अनेकांनी प्रयत्न केले परंतु ते अपयशी ठरले कारण हा किल्ला अभेद्य आहे.कोणत्याच लालसी अभिलाषेने हे संघटन उभे राहिले नाही.तर सावता परिषद हे कल्याणराव आखाडे यांच्या विचारांचे बळ आहे.

सावता परिषदेने श्रीक्षेत्र अरण विकासासाठी घेतलेले परिश्रम,केलेले आंदोलने. माळी समाजाला ज्ञात आहे. श्रीक्षेत्र अरण समाजापर्यंत आणि समाज श्रीक्षेत्र अरण पर्यंत पोहोचविण्याची किमया महाराष्ट्रात फक्त सावता परिषदेच्या माध्यमातून कल्याणराव आखाडे यांनीच केले.राज्यातील माळी समाजाची सक्रीय संघटना आहे.माळी समाजाची सर्वात मोठी संघटना सावता परिषद आहे.या संघटनेचा मी पदाधिकारी असल्याचा मला अभिमान आहे.या नेत्याचे पाठबळ सदैव मिळावं.याच नेत्याचा हात पाठीवर आसावा. असे सदैव वाटते.कारण लोक म्हणतात राजीव काळे कल्याणराव आखाडे यांचा कार्यकर्ता आहे.ही माझ्या निष्ठेची,प्रामाणिकपणाची पावती आहे.

**-डॉ.राजीव काळे**
राज्य प्रवक्ता सावता परिषद
महाराष्ट्र
९४२२४८८४६६

# उमा ताटे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

## कामगार कल्याण केंद्राच्या वतीने शानदार सत्कार सोहळा

परळी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सेवेतून केंद्र महिला कल्याण सहायिका उमा मारोतराव ताटे ह्या नियत वयोमानानुसार शुक्रवारी सेवानिवृत्त झाल्या. यानिमित्ताने त्यांना कामगार कल्याण केंद्रात शानदार सत्कार कार्यक्रमाद्वारे निरोप देण्यात आले.

उमा ताटे ह्या २६ ऑगस्ट १९८७ रोजी नोकरीत रोजी झाल्या. कर्तव्यनिष्ठ व प्रेमळ गुणांमुळे त्यांची ओळख आहे. त्यांनी तब्बल ३८ वर्षे कामगार




कल्याण मंडळात सेवा बजावली. मंडळाच्या उपक्रम, कार्यक्रम आणि योजना कामगारपर्यंत पोहोचून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी त्या विशेष प्रयत्न करायचे. सेवानिवृत्त सोहळ्यासाठी त्यांचे सहकारी, कुटुंबीय व मित्रमंडळी उपस्थित होते. उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढून अनेक आठवणींना उजाळा दिला. त्यांना भेटवस्तू, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी केंद्र संचालक आरेफ शेख, अरविंद पाटील, राजेंद्र देशपांडे, प्रदीप घाडगे, रामचंद्र कांबळे, माधवी घाडगे उपस्थित होते.



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**
**अंबाजोगाईच्या देशपांडे गल्लीतील पुरातन वरद विनायक मंदिरात गणेश जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गणेश याग, महिलांच्या भजनाचा कार्यक्रम,अथर्वशिर्ष पठण श्री.गणेश अभिषेक असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.भक्तांच्या उपस्थितीत मंत्र घोषाने फुले उधळुन गणेश जयंती साजरी करण्यात आली.परिसरातील महिला,नागरिक,युवक महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# रात्री झोपण्यापूर्वी शरीराच्या 'या' भागावर लावा तेल

## सकाळी उठल्याबरोबर दिसतील १० फायदे

शरीराला तेल लावण्याचे अनेक फायदे आयुर्वेदात सांगण्यात आलंय. जन्मापासून पारंपारिक पद्धतीने तेल लावण्याची परंपरा आजही अस्तित्वात आहे. लहान बाळापासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सगळ्यांना शरीराला तेल मालिश ही आरोग्यदायी असते. पण शरीराच्या विशिष्ट भागाला तेल लावल्यास तुम्हाला अनेक फायदे मिळतात. झोपण्यापूर्वी नाभीला तेल लावल्यास तुम्हाला १० आरोग्यदायी फायदे होतात. ही एक थेरपी असून तुमची नाभी हा शरीरावरील फक्त एक छोटासा बिंदू नसून तो एक कक्ष आहे. ज्यामध्ये आरोग्याच्या अनेक समस्यांवर उपाय दडलेले आहेत. नाभी शरीराच्या अनेक नसांशी जोडलेली असते आणि जेव्हा ते तेलाने पोषित केले जाते तेव्हा ते काही आरोग्य समस्यांपासून देखील मुक्त होते. नाभीला तुम्ही नारळ, मोहरी किंवा रोझमेरी हे तेल लावू शकता.

मासिक पाळीतील वेदना कमी होते

नाभीवर तेल लावल्याने मासिक पाळीच्या दुखण्यापासून आराम मिळतो. नाभीला तेल लावल्याने वेदना कमी होतात. नाभीला तेल लावल्याने तुमच्या गर्भाशयाच्या अस्तराच्या आजूबाजूच्या नसांना आराम तर मिळतोच, शिवाय शरीराला नवसंजीवनी मिळते.

प्रजनन क्षमता सुधारा

नाभी हे आई आणि मुलाचे बंधन आहे. तेल लावणे आणि नाभीला मालिश केल्याने महिला आणि पुरुष दोघांची प्रजनन क्षमता सुधारते. तेल लावल्याने शुक्राणूंची संख्या सुधारण्यास मदत मिळते.

चक्र संतुलित करते

योग आणि आयुर्वेद दोन्ही नाभीकडे विशेष लक्ष देतात, जे ऊर्जा केंद्रांपैकी एक मानले जाते. त्यामुळे नाभीची विशेष काळजी घेतल्याने चक्रांचे संतुलन होते आणि तुमच्या शरीराला ऊर्जा मिळते.

दृष्टी सुधारते

नाभी तुमच्या डोळ्यांकडे जाणाऱ्या नसांशी जोडलेली असते. जर तुमची दृष्टी खराब असेल तर नाभीवर मोहरीचे तेल लावल्याने तुमच्या डोळ्यांचे आरोग्य सुधारू शकते. फुगलेले डोळे आणि काळी



वर्तुळे कमी करण्याचा हा एक चांगला मार्ग आहे.

सांधेदुखी कमी करते

वाढत्या वयानुसार, सांधेदुखी आणि अंगदुखी सामान्य असते. त्याचा परिणाम तुमच्या दिनचर्येत होतो. एरंडेल तेल आणि रोझमेरी तेल यांसारख्या तेलांनी नाभीला नियमितपणे मसाज केल्याने लक्षणांपासून आराम मिळू शकतो आणि तुमच्या वेदना चांगल्या प्रकारे नियंत्रित करता येतात.

चेहऱ्याचा रंग सुधारतो

तुम्हाला चमकणारा चेहरा आणि चांगली त्वचा हवी असल्यास, नाभीला तेलाची मसाज करणे आणि नियमितपणे तेल लावणे गरजेचे आहे. तुमच्या नाभीला तेल लावल्याने तुमचे रक्त शुद्ध होते आणि शरीरातील अशुद्धता आणि डाग दूर होतात. कडुलिंबाचे तेल, गुलाबाचे तेल, खोबरेल तेल किंवा लिंबू तेल वापरणे ही युक्ती करू शकते.

संसर्गापासून मुक्ती मिळते

जेव्हा तुम्ही नाभी स्वच्छ करत नाही, तेव्हा ते तुम्हाला आतून आणि बाहेरून संक्रमणास बळी पडू शकतं. संक्रमणांवर उपचार करण्यासाठी आणि नैसर्गिकरित्या जंतू नष्ट करण्यासाठी तेल हा एक चांगला पर्याय असू शकतो. मोहरी किंवा चहाच्या झाडासारखे तेल वापरल्याने केवळ जीवाणू नष्ट होत नाहीत तर ते परत येण्यापासून देखील प्रतिबंधित होतात.

पोटदुखीवर उपचार करते

जर तुम्हाला पोटदुखी, फुगणे किंवा मळमळ होत असेल तर मोहरीचे तेल आणि आले यांचे मिश्रण तुमच्या नाभीवर हलक्या हाताने मसाज करा. अस्वस्थता आणि पाचन समस्यांपासून आराम मिळवण्याचा हा एक चांगला मार्ग आहे.

याची काळजी घ्या!

नाभीवर थोडे तेल लावून स्वत:ला चांगला मसाज देण्यास काहीही नुकसान नसले तरी ते जास्त होणार नाही याची काळजी घ्या. नाभीवर जास्त दबाव टाकू नका, कारण पोट आणि आतड्याचा भाग शरीरातील अनेक नसांचे घर असतं.

# विश्व स्कूल उकडपिंप्री येथे ए.बी.सी. किड्स प्रोग्राम चे उद्धाटन

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उक्कडपिंप्री येथे शेतकऱ्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमाचे मोफत शिक्षण देणाऱ्या विश्व इंटरनॅशनल स्कूल येथे प्रजासत्ताक दिन रोजी ए.बी.सी. किड्स प्रोग्राम चे उद्धाटन मा. श्री. अविनाश भास्कर चाटे यांच्या हस्ते झाले. ए.बी.सी. प्रोग्राम द्वारे विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, कोडींग, अबॅकस, आर्टिफिशियल इंटेलिजन्स चे मोफत प्रशिक्षण वर्ग सुरुवात झाले आहेत. हजारो रुपये फीस असणारे कॉम्प्युटर प्रोग्राम चे शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या मुलांनी टेक्नॉलॉजीच्या युगात बालपणीच पाया मजबूत करण्याकरिता असा कोर्स ए.बी.सी. ट्रेनिंग छ. संभाजीनगर यांनी डिझाईन केलेला आहे. विश्व स्कूलचे संचालक श्री शैलेश महारुद्र सांगळे यांच्या विशेष प्रयत्नातून एबीसी किड्स प्रोग्राम श्री.अविनाश भास्कर चाटे यांनी मोफत स्वरूपात त्यांच्या संस्थेद्वारे मंजूर केले आहे. या बेसिक कोर्सचा विद्यार्थ्यांना नक्कीच भविष्यात खूप मोठा फायदा होईल, असे प्रतिपादन श्री. अविनाश चाटे सरांनी व्यक्त केले आहे.




आर्टिफिशियल इंटेलिजन्स, कोडींग, रोबोटिक्स चे प्रोग्राम भविष्यात जगावर राज्य करतील याची पकड बाल वयात मुलांना मिळाल्यास नक्कीच याचा खूप मोठा फायदा शेतकऱ्यांच्या मुलांना होणार आहे. यावेळी श्री.अनंता धसे, श्री. बबनराव बांगर, श्री. हरी कुंडरे सर, श्री.योगिराज ठेंगल, विद्यार्थी व मोठ्या प्रमाणात परिसरातील पालक वर्ग उपस्थित होता. या प्रोग्रामचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन विश्व स्कूलच्या प्रिन्सिपल सौ. उषा ढोले यांनी केलेले आहे.

### रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील निरूपयोगी

# रेल्वे पुलाची तपासणी करणार का?? रेल्वे रुळ ओलांडताना ग्रामस्थांचे हाल :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा मुद्दा म्हणजे अहिल्यानगर - बीड - परळी रेल्वे मार्ग या वर्षात रेल्वे धावणार असून ४० वर्षापासून पाहिलेले बीडकरांचे स्वप्न साकार होणार असल्याने बीडकरांना रेल्वे चाचणी उत्सुकता आहे. यादरम्यान नवगणराजुरी ते बीड अशा १३ किलोमीटर अंतरावर रेल्वे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले असून जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात या मार्गावरील सुरक्षित चाचणी घेण्यात येणार असल्याची घोषणा गेल्या महिन्यात करण्यात आली होती. याच धर्तीवर रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा हे स्वतः ५ फेब्रुवारी रोजी राजुरी ते बीड स्थानकांदरम्यानची तपासणी करणार आहेत. बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात

आलेल्या आणि निरूपयोगी असलेल्या पुलाची पाहणी करणार का? संबंधित प्रकरणाची चौकशी करणार का? आणि शासनाची दिशाभूल व आर्थिक नुकसान प्रकरणी संबंधितांकडून नुकसान भरपाई वसूल करणार का? त्याच बरोबर याठिकाणी रेल्वे कर्मचाऱ्यांनी रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना न केल्याने ग्रामस्थांचे हाल होत असुन याची दखल घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सुचना संबंधित आधिका-यांना देतील



काय? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि शेख युनुस च-हाटकर, सुदाम तांदळे यांनी केला आहे.

# सतीश झिंजुर्के यांची धामणगाव उपसरपंच पदी निवड

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील धामणगाव येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी सतीश एकनाथ झिंजुर्के यांचे निवड करण्यात आली या त्यांच्या निवडीबद्दल संजय नाना गाढवे, मनोज शेठ( गाढवे सरपंच ) शरद चौधरी, हनुमान झिंजुर्के,सागर झुंजुर्के, अशिश झिंजुर्के, कश संदीप रमेश चौधरी, युवराज झिंजुर्के, सह ग्रामसेवक तलाठी यांनी त्यांच्या अभिनंदन केले निवडी नंतर ते म्हणाले की मी गावातील जेष्ठ पुढाऱ्यांच्या विचाराने जेवढे काम करता येतील तेवढे काम करण्यासाठी मी प्रयत्न करणार



आहे त्याचबरोबर संजय नाना गाढवे व मनोज शेठ गाढवे सरपंच यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवा करण्याचा मी प्रयत्न करीन असे ते म्हणाले

# एसपी नवनीत कॉवत ॲक्शन मोडवर! ५१ वाळू तस्करांना कार्यालयात बोलावून दिला इशारा!

## २६ जणांविरुद्ध अभिलेख तपासणी करून प्रतिबंधक कारवाई

बीड ।प्रतिनिधी

गेवराई : बीड जिल्ह्यामध्ये अवैध वाळू आणि राख तस्करी बोकाळल्याचा आरोप होत असताना पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी वाळू तस्करांना इशारा दिला आहे. जिल्ह्यातील ५१ वाळू तस्करांना कार्यालयात बोलावून त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. अवैध वाळू तस्करी बंद केली नाही तर हद्दपारी आणि मकोकाची कारवाई करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला. तसेच यावेळी २६ जणांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. पोलिस अधीक्षकांच्या या ठोस कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करीला लगाम बसणार असल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्या इसमांना पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी कार्यालयात बोलावले. कोणीही यापुढे वाळूची अवैध तस्करी आणि वाहतूक करणार नाही. अन्यथा संबंधित इसमांविरोधात हद्दपार आणि मोक्का कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. सोबतच या प्रकरणातील २६ इसमांविरुद्ध अभिलेख



तपासणी करून प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. तसेच त्यांनी बाँडचे उल्लंघन केल्यास त्यांची बाँड रक्कम शासनाकडे जमा करण्याची कार्यवाही केली जाईल, असा सक्त इशारा देण्यात आला.

गेवराई पोलीस ठाण्यातील दोन पोलिसांना निलंबित केलं

अवैध वाळू उपसा केल्याच्या प्रकरणातील आरोपींशी साटे लोटे करणाऱ्या बीडच्या गेवराई पोलीस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी केली. गेवराई पोलिस ठाण्यातील सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलीस हवालदार अशोक हंबर्डे यांचा यामध्ये समावेश आहे.

या दोघांनी वाळूच्या दोन ट्रॅक्टरवर कारवाईचे आदेश असतानाही वाळूसह गाडी ताब्यात न घेता फक्त वाहन ठाण्यात आणून लावले. शिवाय गुन्हा दाखल करण्यास देखील विलंब केला. हा प्रकार म्हणजे

# चोरीस गेलेले मोबाईल फोन पोलिसांनी मिळून दिले परत. बीड शहर डीबी पथकाची ४८ तासात कामगिरी



दोन दिवसांपूर्वी जिजामाता चौक येथे भाजीपाला विकणाऱ्या महिला उर्मिला गणेश काशीद राहणार जिजामाता चौक, बीड यांचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता.तसेच निलेश फुलचंद तिडके राहणार धानोरा रोड बीड. यांचा मोबाईल रिक्षात विसरून राहिला होता परंतु रिक्षावालाने तो लबाडीने चोरून ठेवला होता.या दोन्ही मोबाईलचा तपास बीड शहराच्या डीबी पथकाने वेगाने करून ४८ तासाच्या आत दोन्हीही मोबाईल परत मिळून दिले. दोन्ही मोबाईल महागडे होते आणि ते मोबाईल परत मिळाल्यानंतर यातील पीडित यांनी समाधान व्यक्त केले आहे.सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विश्वंभर गोलडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलिस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांच्या पदरी परत निराशाच – अँड श्रीनिवास बेदरे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी केंद्र सरकारच्या अर्थसंकल्प सादर करीत असताना, विविध प्रकारच्या कर रचनेतून सूट दिली मात्र सर्वसामान्य नागरिकांची इन्कम कशी वाढेल या संदर्भात कुठल्याही प्रकारची प्रभावी तरतूद सांगितली नाही, देशात इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र सर्वाधिक कर देणारा राज्य असताना देखील या बजेटमध्ये केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला डावलण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे मत बीड जिल्हा युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे. देशातील सर्वसामान्य जनतेने केंद्रातील नरेंद्र मोदीच्या नेतृत्वातील भाजप सरकारला तिसऱ्यांदा सत्तेत बसवले मात्र देशातील शेतकरी, महिला, युवक, लघु व्यापारी या सर्वांची दिशाभूल करण्याचं काम या बजेटच्या माध्यमातून झाले आहे, युवकांसाठी कायमस्वरूपी रोजगाराच्या योजना नाही, महागाई कमी होईल असे कुठलाही निर्णय नाही, देशाचा कणा असणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य हमीभाव मिळेल याकरिता किमान आधारभूत किंमत वाढवण्यासाठी धोरण नाही, इनकम नाही वाढवता इन्कमच्या करात सूट देण्यात येईल असे दाखवण्यात आले मात्र सर्वसामान्य नागरिकांची इन्कम कशी वाढेल ते मात्र सांगण्यात आले नाही, त्यामुळे महाराष्ट्राच्या पदरी परत एकदा निराशाच पडली आहे असे मत बीड जिल्हा युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.



# घाटशिळ पारगावच्या दोन भुमिपुत्रांचा गावच्या वतीने गुणगौरव

मा.सरपंच वैजिनाथ खेडकर/आर्जुन खेडकर साहेब

आज घाटशिळ पारगावचे भुमि पुत्र शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड आजिनाथ कुंडलिक खेडकर यांची निवडं टि करप्शनब्युरोच्या बीड जिल्हाअध्यक्ष पदि झाली.व पोलिस राखीवदला मधे उत्कृष्ट काम केल्या बद्दल प्रकाश घोडके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवण्यात येणार आहे.त्यांच्या वतीने त्यांचे वडील रामनाथ घोडके यांनी सत्कार स्विकारला या दोन भुमिपुत्रांचा गुणगौरव सोहळा आज घाटशिळ पारगाव येथे पारपडला या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन घाटशिळ पारगावचे मा.सरपंच वैजिनाथ खेडकर.सरपंच नवनाथभाऊ खेडकर.आर्जुन खेडकर साहेब.संजय एकनाथ खेडकर.यांनी गावकऱ्यांच्या वतीने केले होतो. कुठल्याही कामात आग्रेसर आसणारे मातोरी गटाचे नेते वैजिनाथ खेडकर यांनी बोलताना सांगितले की आमच्या गावचे हे दोन भुमिपुत्रांचा गुणगौरव करतांना आनंद होत आहे एका जवानाचे कामदेश रक्षाणाचे आहे आणि एका नेत्याचे काम समाजाला दिशा देण्याचे व समाज्याच्या हिता साठी आन्याय विरुद्ध लढण्याचे आहे.दोन्हि भुमिपुत्र समाज सेवाच



करतात आणि आमच्या गावाचे नाव रोशन करता म्हणून आज गावच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात आले.गावचे सरपंच नवनाथभाऊ खेडकर बोलताना म्हणले.आसे समाजहिताचे काम करणाऱ्या पाठीमाघे गावची ताकत उभी करणार आहे.आणि भाऊ बाबांचा आशिर्वाद आहे.तसेच पुढे शिवसेनेचे सोपान मोरे.यांनी पण मनोगत व्यक्त करुन हार्दिक शुभेच्छा दिल्या.ंटि करप्शनब्युरो ऑफ इंडियाचे जिल्हा अध्यक्ष आजिनाथ खेडकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले मी बीड जिल्ह्यातील जनते साठी कामकरतोय आणि आता सर्व क्षत्रातील लोकांना उपयुक्त आसी मदत मी करणार आहे सरकारी कर्मचारी आणि जनता यांच्या मधला दुवा म्हणून मी काम करणार आहे लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी रात्रन दिवस काम करुन बीड जिल्हा भ्रष्टाचार मुक्त करण्याच काम मी करणार आहे.त्या वेळी उपस्थित गावचे जेष्ठ नागरिक भानुदास कारभारी खेडकर.भिमराव गुरुजी खेडकर.आश्रुबा नेहकर मिस्तरी.विष्णु बाबुराव खेडकर सर.ग्रामसेवक संजय सानप.कारभारी आण्णा खेडकर.रावसाहेब मेजर खेडकर.मा.उपसरपंच राजेंद्र कारभारी खेडकर.ऊध्दव खेडकर मुकादम.माहादेवआण्णा खेडकर.नवनाथ रामराव मुकादम.गोरक्षनाथ खेडकर सर.राजेंद्र रावसाहेब खेडकर सर.बाबासाहेब नेहकर साहेब.ग्रा.मे.भागवत खेडकर. भगवान नेहकर.बाबासाहेब यशवंत मुकादम.आजिनाथ बबन खेडकर.रामनाथ घोडके.आश्रुबा खाडे दाजी.नवनाथ आण्णा खेडकर.विकास खेडकर.शेषराव काशिनाथ खेडकर.शेषराव केदार.गहिनाथ नेहकर.मनसे तालुका प्रमुख गोरक आण्णा खेडकर.महादेव आण्णा टेकाळे.आर्जुन नाना खेडकर.कुंडलिक रामराव खेडकर.आंबदास आण्णासाहेब खेडकर .मा.उपसरपंच राजु सानप.विष्णु शिवनाथ खेडकर.कृष्णा खेडकर.आजिनाथ रावसाहेब खेडकर .शेषराव तात्या खेडकर.राहुल खेडकर.माहादेव उत्तम खेडकर.

# पंतप्रधान घरकुल आवास योजना, मंजूर लाभार्थ्यांनी दोन दिवसात कागदपत्राची पूर्तता करावी

गटविकास अधिकारी, सचिन सानप

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत.. लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. गावनिहाय ग्रामपंचायत कार्यालया समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसांत आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा ..आणि मार्च अखेपर्यंत घराचे बांधकाम पूर्ण करावे असे आवाहन आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ.सचिन सानप यांनी केले आहे याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, आ.सुरेश धस अण्णा यांनी प्रयत्नपूर्वक आष्टी तालुक्यामध्ये अनेक गावातील लाभार्थ्यांसाठी पंतप्रधान घरकुल योजना-ग्रामीण टप्पा -२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे काम हाती घेतले आहे.. प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी तालुक्यात ६१५७ घरकुले मंजूर झाले असून यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.



यासाठी १) ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा, २) आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसात करावी. पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पहिल्या हप्त्याचे अनुदान जमा केले जाणार आहे. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा करावेत म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा पहिला हप्ता जमा होणार असून या घरकुलांचे बांधकाम मार्च २०२५ अखेर पूर्ण करावे याबाबत माननीय आमदार सुरेश धस अण्णा यांनी याबाबत बैठकीमध्ये निर्देश दिलेले आहेत त्यानुसार सर्व लाभार्थ्यांनी दोन दिवसात कागदपत्र जमा करून पहिला हप्ता पदरात पडून घ्यावा आणि बांधकाम सुरू करून उर्वरित अनुदान प्राप्त करून घ्यावे आणि ३१ मार्च २० २५ पूर्वी घरकुलाची बांधकाम पूर्ण करण्यात यावे असे आवाहन ही गट विकास अधिकारी डॉ.सचिन सानप यांनी केले आहे

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT